D:\APA-2022\Letter 2022.doc


# वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ

**प्रशासकीय इमारत, कृषि नगर, वसमत रोड, परभणी - ४३१ ४०२**

| | | | |
|---|---|---|---|
| ई-मेल | : reg_mau@rediffmail.com | दूरध्वनी | : (०२४५२) २२९७५५ |
| वेबसाईट | : www.vnmkv.nic.in | फॅक्स | : (०२४५२) २२९७५५, २२३५८२ |


**वाचा :** मा.सहसंचालक (प्रशासन), कृषि परिषद, पुणे यांचे पत्र जा.क्र./मकृप/आस्था- ३/९८३/२०२२ दि.२५/०४/२०२२

क्र.२०२२/प्र.क्र.१२४८/आस्था-१/2437 दिनांक : ०९.०६.२०२२

## परिपत्रक

संदर्भीय पत्रान्वये सहसंचालक (प्रशासन), महाराष्ट्र कृषि शिक्षण व संशोधन परिषद, पुणे यांनी कृषि विद्यापीठातील वरिष्ठ सहयोगी प्राध्यापक/ प्राध्यापक (कॅस) / प्राध्यापक या संवर्गातील जे अधिकारी महाराष्ट्र कृषि शिक्षण व संशोधन परिषद पूणे येथे प्राध्यापक व उच्च संवर्गातील पदांची भरती प्रक्रिया राबविण्याकरीता त्यासंबंधीचे काम करण्याकरीता सेवासंचित तत्वावर नियुक्ती स्विकारण्यास तयार आहेत अशा चारही कृषि विद्यापीठाकडून इच्छुक अधिका-यांचे प्रत्येकी २ प्रस्ताव त्यांच्या मागील ३ वर्षाचे गोपनीय अहवाल, ना चौकशी प्रमाणपत्र व विनंती अर्जासह कृषि परिषदेस पाठविण्याबाबत कळविले आहे.

तेंव्हा सदर परिपत्रकाद्वारे विद्यापीठातील सहयोगी प्राध्यापक, प्राध्यापक (कॅस) व प्राध्यापक संवर्गातील अधिका-यांना कळविण्यात येते की, जे अधिकारी महाराष्ट्र कृषि शिक्षण व संशोधन परिषद पूणे येथे प्राध्यापक व उच्च संवर्गातील पदांची भरती प्रक्रिया राबविण्याकरीता त्यासंबंधीचे काम करण्याकरीता सेवासंचित तत्वावर नियुक्ती स्विकारण्यास तयार/ इच्छुक आहेत, त्यांनी त्यांचे प्रस्ताव, मागील ३ वर्षाचे गोपनीय अहवाल व ना चौकशी प्रमाणपत्रासह त्यांचे विनंती अर्ज योग्य माध्यमाद्वारे कुलसचिव कार्यालयास दिनांक २०.०६.२०२२ पुर्वी सादर करावेत. विहित मुदतीनंतर प्राप्त झालेल्या अर्जांचा विचार करण्यात येणार नाही याची नोंद घ्यावी.

विद्यापीठातील सर्व आहरण व संवितरण अधिका-यांना सुचित करण्यात येते की, सदर परिपत्रक सर्व संबंधिताच्या निर्देशनास आणून इच्छुक असणा-या अधिका-यांचे प्रस्ताव विहित मुदतीत सादर करावेत.

मा.कुलगूरू महोदय यांच्या मान्यतने.

०९/६/२२

(धिरजकुमार रा.कदम)
**कुलसचिव**

**प्रतिलिपी :**

१. संचालक शिक्षण तथा अधिष्ठाता (कृषि) / संचालक संशोधन / संचालक, विस्तार शिक्षण , वनामकृवि, परभणी
२. सहयोगी अधिष्ठाता (शिक्षण), वनामकृवि, परभणी
३. नियंत्रक वनामकृवि, परभणी
४. प्रभारी अधिकारी, मध्यवर्ती संगणक केंद्र यांना देऊन सुचित करण्यात येते कि, सदर परिपत्रक विद्यापीठ संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात यावे.

**प्रत :** मा. कुलगुरु यांचे खाजगी सचिव, वनामकृवि, परभणी.